शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड
वीर सावकर मार्ग, बाबानगर, नांदेड

इ-निविदा सूचना

या संस्थेच्या सफाईगार सेवेसाठी बाहय यंत्रणेची निवड करण्याकरिता नोंदणीकृत संस्था/आस्थापना यांच्याकडून इ-निविदा क्रमांक 2026_DTEDM_1354844_ 1 नुसार इ-निविदा दर पत्रक मागविण्यात येत आहे.

इच्छूकांनी इ-निविदा भरण्यासाठी htpps://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर भेट द्यावी.

अधिक माहिती करिता संस्थेत संपर्क साधवा. अथवा संस्थेचे संकेतस्थळ www.gpnanded.org.in ला भेट द्यावी.

महत्वाच्या तारखा : सुरुवात दिनांक : २०/११/२०२६

समाप्तीची तारीख : ०७/१२/२०२६

(डॉ. नागेश एल. जानराव)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

क्रमांक/ शातनिनांदेड/ आस्थापना-२/२०२६/ 6400 दिनांक: 18 NOV 2026

निविदा सुचनाः- प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड या संस्थेच्या सफाईगार सेवा कामी बाह्य एजन्सी ची निवड करण्यासाठी ई. निवीदा मागवित आहे. मान्यता प्राप्त नोंदणीकृत संस्थानी निविदा प्रक्रियेत भाग घेणे आपेक्षित आहे.

ई. निविदा संबधी विवरण

१. अधिकतम निवीदा मुल्य अंदाजे रु ४०,००००/- (४० लाख रूपये फक्त)
२. सुरक्षा अनामत १००,०००/-
३. निविदा फिस ३५४०/- (ना परतावा)
४. निवड पश्चात भरावयाचे डिपॉझिट २००,०००/-

संस्थेचा पत्ताः प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
विर सावरकर मार्ग, बाबा नगर नांदेड-४३१६०२ महाराष्ट्र.

महत्वाच्या तारखा:

१.ई. निविदा घेणे २०.११.२०२६ ते ०७.१२.२०२६ सायंकाळी ५ पर्यंत
२. निविदा भरणे कालावधी २०.११.२०२६ ते ०७.१२.२०२६ सायंकाळी ५ पर्यंत
३. निविदा उघडणे सभा कक्ष (conference Hall) मुख्य प्रशासकीय इमारत ०९.१२.२०२६ सकाळी ११:३० वाजता

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

प्रतः-1. ई-निवीदा पोर्टल महाराष्ट्र राज्य https://mahatenders.gov.in
2) मा.सहसंचालक तंत्रशिक्षण छत्रपती संभाजीनगर संकेतस्थळ https://dteau.org
3. संस्थेचे संकेतस्थळ संकेत स्थळ: http://gpnanded.org.in
4. संस्थेचे सुचना फलक
5 एक स्थानिक वृत्तपत्र तसेच एक विभागीय स्तरावरील वृत्तपत्र यामध्ये प्रसिद्धीसाठी

शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

निविदा फॉर्म सोबत दोन पाकिटे जोडली आहेत.

पाकीट क्रमांक. ०१ (तांत्रिक):-

या मध्ये सर्व तांत्रिक बाबी / कागदपत्रे यादी प्रमाणे प्रत्येक कागदपत्राचे स्वतंत्र pdf जोडून लिफाफा online अपलोड करावयाचा आहे. यादीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक डॉक्युमेंटचे जोडावयाच्या फाईल मध्ये नमूद केलेल्या डॉक्युमेंटचे यादीप्रमाणे स्वतंत्र पीडीएफ जोडले नसल्यास अर्ज बाद करण्यात येईल त्यामुळे याबाबत प्रत्येक डॉक्युमेंट काळजीपूर्वक व नेमकी **Exact** पीडीएफ फाईल अपलोड करावी

फिस डिटेल्स टेंडर कॉस्ट ३५४० व सुरक्षा अनामत रक्कम १००००० (EMD) भरल्याचा पुरावा अपलोड करणे

पाकीट क्रमांक. ०२ (BOQ) commercial bid

हा वाणिज्यिक(**Commercial)** बाबतीत असून त्यामध्ये सुरक्षा रक्षकास प्रदान करावयाचे किमान वेतन **DA, ESI,EPF** इतर काही कायदेशीर देय बाबी इत्यादी विहित, नमुन्यात भरावयाची आहेत. आपण एजन्सी सेवा चार्जेस व व्यवस्थापन आणि इतर चार्जेस एकत्रितपणे या मध्ये भरावयाचे आहे.

०३ तांत्रिक बाबतीत आपली संस्था कागदपत्रा अभावी अपात्र ठरल्यास आपली **commercial bid** उघडण्यात येणार नाही व पुढे प्रक्रियेत आपण अपात्र ठराल.

०४. कागदपत्रासाठी कोणतीही सवलत मागू नये. अशी मागणी मान्य केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

०५. **संस्थेचा** बैंक खाते क्र. ६२०९७६३१३६३ बैंक SBI शाखा IE शिवाजी नगर नांदेड महा इ टेंडर साइटवर संलग्न आहे.

दोनही पाकिटे ई निविदेत भरावयाची असून . पोस्टाने कूरियर ने पाठवू नये. तसे स्विकारले जाणार नाही.



2/10

प्रति सफाईगार वेतन व भत्ते (लिफाफा क्रमांक-२)

(Commercial) लिफाफा झोन १ अकुशल कर्मचारी प्रति **सफाईगार** dry व **सफाईगार** wetwet भरावयाचे आहे (महिला/ पुरुष) या मध्ये Bidder ने एजन्सी चार्ज भरावयाचे आहे किमान वेतन प्रचलित कायद्यानुसार एकूण वेतन अक्षरी सर्व टॅक्सेस धरून भरावयाचे आहे

अ.क्र.	विवरण	दर प्रति सफाईगार (DRY) Bidder to fill in Rupees/per unit
१	किमान वेतन प्रचलित कायद्यानुसार मुळ वेतन	
२	Special Allowance/DA	
३	Employer Contribution of ESI (3.25%) of sum 1 and 2	
४	Employer Contribution of EPF (13.00%) of 1 and 2 (it is EPF 12% ELDI 0.5% EPF Management \ Charge 0.5%)	
५	Agency service Charges	
६	Management Charges	
७	GST applicable to Sum (१-६)	
	एकूण अक्षरी	

अ.क्र.	विवरण	दर प्रति सफाईगार (WET) Bidder to fill in Rupees/per unit
१	किमान वेतन प्रचलित कायद्यानुसार मुळ वेतन	
२	Special Allowance/DA	
३	Employer Contribution of ESI (3.25%) of sum 1 and 2	
४	Employer Contribution of EPF (13.00%) of 1 and 2 (It is EPF 12% ELDI 0.5% EPF Management \ Charge 0.5%)	
५	Agency service Charges	
६	Management Charges	
७	GST applicable to Sum (१-६)	
	एकूण अक्षरी	

नाव:-

स्वाक्षरीः-

एजन्सीचा शिक्का:-



4/10

शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

नोंदणीकृत सुरक्षारक्षक पुरवठादार संस्थेद्वारे **सफाईगार** पुरवठा करणे संदर्भात ई-निविदा पाकीट क्र.०१ मध्ये खालील आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

कागदपत्राचे / प्रमाणपत्रांचे विवरण

१ निविदा शुल्क भरणा केल्याची पावती.
२ **EMD** रक्कम भरणा केल्याची पावती.
३ **Shop Act.** अंतर्गत संस्था/कंपनी नोंदणी प्रमाणपत्र
४ निविदाधारकांनी त्यांच्या **सफाईगार** संस्था/एजन्सीमार्फत नेमण्यात येणारे **सफाईगार** यांना कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याबाबतचे रु.१०० च्या बाँडवर नोटरीकृत शपथपत्र सादर करावे
५कामगार सहा. आयुक्त यांचे (लेबर लॉ) लायसेन्स किंवा नोंदणी प्रमाणपत्र
६ भविष्य निर्वाह निधी **EPF** नोंदणी प्रमाणपत्र
७ **ESIC** नोंदणी प्रमाणपत्र
८ व्यवसाय कर नोदणी प्रमाणपत्र
९ वस्तु व सेवाकर **(GST)** नोदणी प्रमाणपत्र
१० मागील ३ वर्षातील आयकर भरल्याची विविरणपत्रे **3 Yrs ITR & service Tax/GST Return**
११ मागील ३ वर्षाचे वार्षीक उलाढालीचे सी.ए. (CA) कडून प्रमाणित केलेले ताळेबंद अहवाल. आपल्या संस्थेची वार्षिक उलाढाल किमान एक करोड रुपये असणे अनिवार्य व आवश्यक आहे.
१२ मागील किमान ०५ वर्षाचे शासकीय/निमशासकीय कार्यालयांना **सफाईगार** मनुष्यबळ सेवा पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र
१३ उपलब्ध **सफाईगार** मनुष्यबळाची साक्षांकित यादी
१४ निविदाधारकानी त्यांच्या संस्थेचे नांव कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या काळ्या यादीत नसल्याचे तसेच त्यांच्या संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारची फौजदारी, दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे व कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे नोटरीकृत शपथपत्र रुपये १००/- च्या बाँडपेपर सादर करावे.
१५. इमारतीमधील व्हरांडे इत्यादी मोठ्या भागासाठी मशीनने पोछा मारणे, बाहेरील गवत कापणे साठी आपणाकडे मेक्यानाईजड मशीन असणे आवश्यक असून आपणाकडे उपलब्ध मशीन्स ची यादी जोडावी
१६ **PAN number ,TAN number** संस्था/कंपनी
१७.**ISO certificate** संस्था/कंपनी

शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

5/10

शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड

ठेका पध्दतीने संस्थेतील शौचालय, व्हरांडे, पाय-या, सामुदायीक वापराचे इमरतीमधील भाग ईत्यादी स्वच्छता करण्यास ठेकेदारा संस्थेस लागू अटी व शर्ती

१. आपली सस्था ही स्वच्छता कामासंबधी उदेश असलेली नोंदणीकृत संस्था असावी.

२. संस्थेतील प्रमुख इमारती जसे की मुख्यइमारत व इतर वसतीगृहासहित सर्व इमारती मधील शौचालय, सामुदायीक वापराचा भाग,वर्गखोल्या नियमीतपणे स्वच्छ करावा लागेल.

३. ठेका कालावधी नेमुन दिलेल्या दिनांका पासून ११ महिन्यांचा असेल सेवा असमाधानकार आढळल्यास ठेका हा रद्द करण्यात येईल.

४. संस्थेस अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र अर्जा सोबत जोडावे. किमान तीन वर्ष सरकारी कामाचा अनुभव अनिवार्य.

५. आपल्या संस्थेमार्फत नेमलेल्या व्यक्तीचे आधार कार्ड अथवा इतर ओळखीचा पुराव जोडावा व त्यांना आपल्या संस्थेचे ओळखपत्र जवळ बाळगण्यास सांगावे.

६. आपल्या संस्थे मार्फत ०९ पुरुष व ०६ महिला या कामी उपलब्ध करावे लागतील, अतिरिक्त मनुष्यबळ गरजेनुसार लागल्यास तसे कळविले जाईल. Wet and dry सफाईगार चे दर वेगवेगळे द्यावे लागतील

5. आपणास दिलेला ठेका हा तात्पुरत्या स्वरूपात राहील वरिष्ठ कार्यालयाकडून परवानगी न मिळाल्यास अथवा शासनाच्या ध्येयधोरणात बदल झाल्यास ठेका केव्हाही रद्द होईल याची नोंद घ्यावी.

८. आपल्या सस्थेमार्फत गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या व्यक्तीस कामावर नेमता येणार नाही.

९. साफसफाई साहित्य जसे की हारपिक, फिनेल, ब्रश ई साहित्य जपून वापरावे. संस्था हे साहित्य योग्य प्रमाणात पुरवेलः वापरलेल्या साहित्याची नोंद प्रत्येक महिन्याची आपण ठेवावी व नेमून दिलेल्या कर्मचारी यांच्या कडे द्यावी.

१०. आपण दिलेले दर हे शासन नियमा प्रमाणे देया उत्पन्न कर, सेवा कर, जी.एस.टी. ई सामाविष्ट असावेत. नियमाप्रामणे देयकातुन आयकर, इतर कर. नियमानुसार वजावट करण्यात येईल.

११. वय १८वर्ष पेक्षा कमी व ६० वर्षांपेक्षा जास्त असणा-या व्यक्तीस कामावर नेमता येणार नाही.

१२ आपणास परस्पर दुस-या संस्थेस ठेका देता येणार नाही, आपणास सेवा देणे बंद करावयाचे झाल्यास किमान एक महिन्याची पुर्वसुचना द्यावी लागेल. पर्यायी व्यवस्था झाल्यानंतरच ठेका सोडता येईल.

१३ आपण नेमलेल्या व्यक्तीस किमान वेतन कायद्यानुसारच वेतन अदा करावे लागेल व संबंधितास पैसे हे बैंक खात्यावर जमा करावे लागतील याची सर्वस्वी जबाबदारी आपलीं असेल. प्रत्येक महिण्याचे देयक पुढील महिन्याचे पाच तारखेच्या आत सादर करणे आवश्यक राहील. त्यासोबत आपण नेमलेल्या सफाईगारास एनईएफटी /आरटीजीएस द्वारे सरळ त्यांच्या बँक खात्यामध्ये पेमेंट अदा केल्याचा पुरावा जोडावा लागेल

१४. शासनाकडुन निधी प्राप्त होण्यास काही कारणाने विलंब झाल्यास आपण स्वतः नेमलेल्या व्यक्तीचं मानधन द्यावे त्यासाठी कोणताही अग्रीम मिळणार नाही व विलंव बद्दल व्याज देय राहणार नाही याची नोंद घ्यावी. थोडक्यात आपली संस्था अशावेळी आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत असने आवश्यक आहे. आपल्या संस्थेची वार्षिक उलाढाल किमान एक करोड रुपये असणे अनिवार्य व आवश्यक आहे.

१५. नेमलेल्या व्यक्तींचे इ.पी.एफ., समुह विमा बाबत जवाबदारी आपल्या संस्थेची असेल. कामाची वेळ सकाळी ०९:३० ते सायंकाळी ०६ पर्यंत. जेवणाची विश्रांती अर्धातास, रविवार सुट्टी व सोमवार ते शनिवार कामाचे दिवस राहतील.राष्ट्रीय सन (स्वतंत्रता दिवस ,गणतंत्र दिवस) तसेच कामगार दिवस मानधन देय सुट्टी असेल.

१६. सर्व इमारती मधील व्हरांडे झाडणे व फिनेल टाकुन पोछा मारने, सर्व इमारतीमधील संडास, बाथरूम नियमीत स्वच्छता करणे आवश्यक राहील.

शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

6/10

१७. ड्रेनेज लाईन चोकअप ची किरकोळ Maintenance परिरक्षण कामे आपल्या संस्थेमार्फत करने आवश्यक.
१८ संस्थेतील सर्व कचरा एकत्रीत करून महानगरपालीकेच्या घंटागाडीस देणे आवश्यक. कच-याचे वर्गीकरण सुका, ओला, घातक (काच ई.) करावे लागेल.
१९ पाणि गळती होत असल्यास त्वरीत निदर्शनास आणुन द्यावे.
२०. आपण नेमलेले कामगार यांना धुम्रपान, नशापान, तंबाखु, गुटका चे निर्बंध लागू राहतील व ते कोणतेही गैरवर्तन करणार नाहीत याची आपण आवश्यक ती खबरदारी घ्यावी व तक्रार आल्यास अशा कर्मचा-यांना कामावर ठेवू नये २१. सफाईगार कामगारांनी काम करताना संस्था परिसरात सुरक्षेचे आवश्यक नियम पाळले पाहीजेत हॅन्ड ग्लोज, हेल्मेट, सुरक्षा शुज धालने आवश्यक ते आपण म्हणजेच ठेकेदार एजन्सीने त्यांना पुरविणे आवश्यक
२२. सर्व खबरदारी घेवुनही दुर्दैवाने काही अपघात झाल्यास इजा ,दुखापत ,जिवीत, वित्त हानी झाल्यास त्याची नुकसान भरपाई ची जबाबदारी ठेकादार संस्थेची राहील व शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड या संस्थेची याबाबतीत काही जवाबदारी राहणार नाही यांची नोंद घ्यावी.
२३. जमा झालेला कचरा संस्थेच्या परिसरात इमारतीच्या मागे, मैदानात टाकु नये महानगरपालीकेल्या घंटा गाडीस देण्यात यावा व गाडीला सोईचे होईल अशा ठिकाणी ठेवण्यात यावा. याबाबतीत स्वच्छता ठेका एजन्सीने महानगरपालिके सोबत योग्य समन्वय साधून कचरा व्यवस्थित उचलला जाईल याची खात्री करून घ्यावी
२४. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे शपथपत्र रू १००/- चे बंधपत्रावर नोटरी करून द्यावे लागेल.
२५.जि.एस.टी. अथवा इतर कोणताही लागु कर TAX याचा आपण दर देताना विचार करावा नंतर या बाबत तक्रार चालणार नाही. याबाबत संपूर्ण जबाबदारी ठेका प्राप्त एजन्सीची असेन.
२६. मुलींचे वसतीगृहासाठी महिला कर्मचारी आवश्यक आणि बंधनकारक पुरूषांना साफाईचे काम तेथे अजिबात करता येणार नाही व मुलांचे वसतीगृहात महिला कर्मचारी चालणार नाही व हाच नियम संस्थेतील विविध महिला/पुरुष शौचालयांसाठी लागू असेन याची पूर्ण गांभीर्याने नोंद घ्यावी. विशेष करून ही बाब पुरेशा गांभीर्याने राबविणे आवश्यक तक्रार झाल्यास कायदेशीर जबाबदारी ठेकेदार संस्थेची राहील.
२७) ठेक्याचे प्रति व्यक्ती दर भरत असताना व्यवस्थापन व सर्विस चार्जेस व इतर सर्व करांचा/ एजन्सीच्या profit फायद्याचा विचार करूनच दर दिलेले आहेत याची खात्री करावी कामगारांचे किमान देय वेतनातून कोणत्याही सबबीखाली वेतन कपात करता येणार नाही तसे केल्या चे तक्रार प्राप्त झाल्यास ठेकेदार संस्था कामगार विभागाकडून कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.
२८) इमारतीमधील व्हरांडे इत्यादी मोठ्या भागासाठी मशीनने पोछा मारणे, बाहेरील गवत कापणे साठी आपणाकडे मेक्यानाईजड मशीन असणे आवश्यक असून आपणाकडे उपलब्ध मशीन्स ची यादी जोडावी
२९) निविदाधारकांनी पाकीट क्र.०२ (दरपत्रक) मधील सुचनेनुसार आपल्या संस्थेस दयावयांचे सर्विस अँड मॅनेजमेंट चार्जेस दर नमुद करतांना वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली ने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्र.F.6/1/2023 PPID दिनांक २३,०६,२०२३, No. F.6/1/2023-PPD दि.०६.०१.२०२३, No. F.6/1/2023-PPD दि.१७.०१.२०२४ मधील सुचना व अटीचे काटेकोरपणे पालन कराये, सदर अटीनुसार सव्हीस चार्जेस दर भरणा केले नसल्यास निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही पुढे त्यामध्ये एजन्सीचा फायदा (profit) ,transaction चार्जेस , आणि इतर कोणताही लागू टॅक्स(GST वगळून) याचा समावेश करावा त्यामुळे हा सदर अतिशय विचारपूर्वक व काळजीपूर्वक भरावा. कामगारांचे वेतनातून कपात करून एजन्सीने कोणताही फायदा घेणे ,एजन्सीचा खर्च भागविणे अपेक्षित नाही म्हणून एजन्सी साठी हा स्वतंत्र हेड BOQ मध्ये दिलेला आहे.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

ठेका पध्दतीने संस्थेतील शोचालय, परिसर, स्वच्छता करण्यासाठी निवड झालेल्या नोंदणीकृत संस्था /ठेकेदारा संस्थेसाठी अटी व शर्ती मान्य असल्याबाबत चे शपथपत्र

१. आमची संस्था ही साफ सफाई कामे करणे या उद्देशासह नोंदणीकृत संस्था असून नादेड जिल्हयातील कार्यक्षेत्रात आहे / नसल्यास कार्यकक्षा वाढ बाबत ठराव घेऊन सोबत जोडत आहे.
२. आमच्या संस्थे मार्फत या संस्थेतील शौचालय, परिसर स्वच्छता, काटेरी झुडपे, कचरा ई. स्वछता कामे नियमीतपणे करून देण्यात येतील
३. आमच्या संस्थे मार्फत **०९ पुरुष व ०६ महिला** या कामासाठी नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येतील.
४. सदरील ठेका सुरूवात पासून ११ महिन्यापर्यंत कालावधीसाठी वैध राहील व समाधानकारक सेवा नसल्यास आमच्या संस्थेला दिलेला ठेका रद्द करण्यात येईल याची आम्हाला जाणीव आहे व ते आम्ही मान्य करतो. संस्थेची स्वच्छता कामासाठी बाह्य यंत्रणा म्हणून नेमणुक तात्पुरत्या स्वरूपात आहे.
५. संस्थेकडे असलेल्या अनुभव प्रमाणपत्राची प्रत जोडली असून. किमान ६ वर्ष आवश्यक अनुभव आहे व सोबत सर्व अनुभव प्रमाणपत्रे जोडली आहेत व ती खरी आहेत
६. आमच्या संस्थे मार्फत नेमलेल्या व्यक्तींचे आधार कार्ड इतर फोटो आयडी, ओळखीचा पुरावा आमच्याकडे आहे व त्याची एक प्रत आपणास माहितीस्तव देत आहोत
७. सदरील ठेका आमच्या संस्थेस तंत्र शिक्षण विभागाच्या वरिष्ठ कार्यालय यांचे परवानगीच्या अधिन राहून आपण म्हणजेच प्राचार्य यांनी दिलेला आहे . सदरील तात्पुरत्या स्वरूपातील ठेका असून कालावधी संपल्यानंतर वाढ करणे, न करणे, नव्याने निवीदेव्दारे देणे हा हक्क प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड हे राखून ठेवत आहेत. हे आम्हाला मान्य आहे
८. गुन्हेगार पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना कामावर नेमलेले नाही तसेच सर्व नेमलेल्या व्यक्तींचे चरित्र पडताळणी प्रमाणपत्र आम्ही आपणास सादर करू
९. सफाई साहीत्य ऍसिड फिनेल ब्रश खराटे झाडू, विळा, कोयता, टोपले, फावडे, कुदळ ई. संस्था देईल परंतू ते योग्य प्रकारे वापरण्याची जबावदारी आमच्या संस्थेची राहील. याची आम्हाला जाणीव आहे त्या वावत आम्ही नोंद ठेवून व दर महिन्याला जे खर्चिक साहित्य खर्च होणार आहे ते प्रमाणित करून देण्याची जबाबदारी आमची राहील.
१०. शासन नियमाप्रमाणे देय उत्पन्न कर, सेवाकर, इतर कुठलेही कर आपल्या आमच्या संस्थेस भरावा लागेल व तो भरल्याचा पुरावा कार्यालयास सादर करण्याची व या संबंधित सर्व जबाबदारी आमच्या ठेका संस्थेची राहील. या सर्व बाबींचा विचार करून दर भरताना आम्ही काळजी घेतली आहे नंतर या बाबतीत आमची तकार चालणार नाही हे आम्हाला मान्य आहे.
११. कोर्टाने शिक्षा दिलेल्या, नैतिक अधःपात दर्शविणा-या गुन्ह्या संबंधीत शिक्षा झालेल्या व्यक्ती, वय अठरा वर्ष पेक्षा कमी असलेल्या बालकांना कामावर नेमता येणार नाही हे आम्हाला माहीत असून अशा कुठल्याही व्यक्तीची नेमणूक आमची ठेका संस्था करणार नाही व याबाबतीत कायदेशीर जबाबदारी आमच्या ठेका एजन्सीची राहील
१२. अटी व शर्ती मान्य असल्याचे आपणास १००/- च्या बंधपत्रावर **(BOND)** लिहून देत आहे व त्यामध्ये बदल करता येणार नाही, संस्थेच्या जवाबदार दोन पदाधिकारी यांनी सदर शपथपत्र द्यावे लागेल हे मान्य असून (अध्यक्ष अथवा सचिव किंवा संचालक) या आमच्या जबाबदार व्यक्तींमार्फत स्वाक्षरी करून हे शपथपत्र देत आहोत

१३. परस्पर आमच्या मार्फत इतर संस्थेस ठेका आमच्या संस्थेस देता येणार नाही याची आम्हाला जाणीव आहे. आमच्या संस्थेस ठेका चालू ठेवायचा नसल्यास ३० दिवस आधि पूर्व कल्पना द्यावी लागेल हे देखील मान्य आहे. तसेच पर्यायी व्यवस्था होईपर्यंत आम्ही सेवा देण्यास बांधील आहोत

१४. किमान वेतन कायद्यानुसार संस्थेस नेमलेल्या व्यक्तीचे वेतन अदा करावे लागेल त्याचे प्रत्येक महिण्यात ५ तारखेच्या आत देयक सादर कराचे लागेल. ई.पी.एफ.,समूह विमा याबाबतीत जबाबदारी आमच्या ठेका संस्थेची राहील याची आम्हाला स्पष्ट जाणीव आहे.

१५. आपणास अदा करण्यात येणारे देयक शासनाकडून निधी उपलब्ध झाल्या नंतर अदा करण्यात पेईल त्यासाठी विलंब झाल्यास मालक संस्था जबाबदार राहणार नाही व होणा-या विलंबास शासकीय तंत्रनिकेतन नांदेड जबाबदार राहाणार नाही. अथवा कोणतेही अग्रीम मजुर केले जाणार नाही व होणा-या विलंब बाबत देय रकमेवर व्याज दिले जाणार नाही याची आम्हाला जाणीव आहे किमान सहा महीने आमची ठेकेदार संस्था नेमलेल्या मनुष्यबळास नियमित वेतन अदा करण्यास सक्षम व जबाबदार राहील हे आम्हाला मान्य आहे ,

१६. ०९ पुरूष ०६ महिला एकूण १५ सकाळी ०९:३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत काम करतील या बद्दल सविस्तर विभागवार वेळापत्रक महिण्याचे तयार करून त्यानुसार व्यक्तीचे ड्युटी या संस्थेच्या अधिका-या सोबत बसून तयार करावे लागेल व त्याप्रमाणे काम करण्याची जवाबदारी आमच्या संस्थेची राहील.

१७. आमच्या मार्फत नेमलेल्या व्यक्तीकडून नुकसान, चोरी, तोडफोड झाल्यास त्याची नुकसान भरपाईची जबाबदारी आमच्या संस्थेची राहील.

१८. आमचा संस्थेने नेमलेल्या व्यक्ती बाबत कसल्याही प्रकारची तक्रार झाल्यास त्या बाबतीत जवाबदारी आमच्या संस्थेची राहील उदा. पोलीस तक्रार, कामगार न्यायालयातील तक्रार ई.

१९. रूपये १००००/- (एक लाख फक्त) सुरक्षा अनामत रक्कम जमा करावी लागेल हे मान्य आहे

२०. साप्ताहीक मुट्टी दर रविवारी राहील. वरील सर्व अटी व शर्ती आमच्या संस्थेस मान्य आहेत सदरील काम संस्थेच्या संचालक मंडळापुढे ठेवून मान्यता आम्ही घेतली आहे व आमच्या संस्थेच्या वतीने सदरील ठेका या मान्य अटी शतीच्या अधिन राहून आम्ही स्वीकारतो संस्थेने आम्हाल तसे अधिकार अध्यक्ष, सचिव, संचालक या नात्याने दिले आहेत.

२१. सर्व इमारतीतील व्हरांडे झाडणे व फिनेल टाकुन पोछा मारणे. इमारतीमधील व्हरांडे इत्यादी मोठ्या भागासाठी मशीनने पोछा मारणे, बाहेरील गवत कापणे साठी आपणाकडे मेक्यानाईजड मशीन असणे आवश्यक असून आपणाकडे उपलब्ध मशीन्स ची यादी आपण तांत्रिक लिफाफ्यामध्ये जोडावी मशीनचा वेगळा कुठलाही चार्ज भाडे दर अतिरिक्त देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. महिन्यातून किमान चार वेळा तरी मशीनने साफसफाई होणे अपेक्षित आहे हे आम्हाला मान्य आहे.

२२. सर्व इमारतीतील संडास व बाथरूम फिनेल / ॲसीडने स्वच्छ करणे. दिवसातून किमान दोन वेळा सकाळी नऊ तीस व दुपारी तीन साडेतीन वाजता तसेच एकंदर वापरावरून काही जास्त वापराचे संडास बाथरूम त्यापेक्षा अधिक वेळा देखील स्वच्छ करणे आवश्यक राहील

२३. ठेकेदार संस्था म्हणून नियमानुसार व्यवस्थापन व सर्विस चार्जेस व इतर सर्व कर आम्ही दर देताना विचारात घेतले आहे नेमलेल्या कामगारांच्या कायदेशीर किमान देय वेतनातून आम्ही कोणत्याही सबबीखाली वेतन वजा करणार नाही असे घडल्यास आम्ही कायदेशीर शिक्षेस पात्र असू याची आम्हाला जाणीव आहे व आम्ही नेमलेल्या व्यक्तींना सर्व देय रकमेच्या तपशीलासह अदाई स्लीप प्रदान करू

२४. सर्व इमारतीलोल मीटर तथा स्टोरेज रूमची सफाई करणे.

२५. किरकोळ ड्रेनेज चोक अपची काम पूर्ण करावी लागेल,

२६.सर्व इमारतीतील कच-याची योग्य विल्हेवाट करावी लागेल. प्लास्टीक साहित्य जाळू नये आणि सर्व कचरा एका ठिकाणी जमा करावा
लागेल

२७. जमा केलेला कचरा इमारतीच्या मागील बाजूस टाकण्यात येणार नाही आणि ओला व सुका कचरा वेगवेगळा करून त्याप्रमाणे विल्हेवाट करावी लागेल

२८. पाणी गळती होत असल्यास त्वरीत सुचित करावे लागेल.

२९ सफाई कामगार कोणत्याही प्रकारचे धूम्रपान किंवा नशा पाणी अथवा गैरवर्तन करणार नाही याची संपूर्ण जबाबदारी आमच्या ठेकेदार संस्थेची असेल

३० कामगारानी काम करताना संस्था परिसरात सुरक्षेचे आवश्यक नियमांचे पालन करणे आवश्यक तथापी काही कारणांनी अपघात इजा आणि आरोग्य विषयक तक्रारी इत्यादी झाल्यास त्याची जवाबदारी ठेकेदार संस्था म्हणून आमची राहील

वरील १ते ३० मधील लिहून दिलेल्या सर्व अटी व सर्दी आमच्या ठेकेदार संस्थेस मान्य असुन मान्य असल्याचे या शपथपत्रावर स्वाक्षरी करून स्पष्ट केले आहे

सदरील ठेका भरण्यासाठी संचालक मंडळ मध्ये ठराव घेण्यात आलेला आहे व सर्व संमतीने आम्ही सदरील ठेका भरत आहोत

अध्यक्ष/ सचिव/ संचालक नाव :

ठेकेदार संस्थेचे नाव :

स्वाक्षरी: **दिनांक:**

ठिकाण: **ठेकेदार संस्थेचा शिक्का**

शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.